# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५**

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - १४

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडडी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०५, कला व संस्कृती**<br>**रूपये:- १२,२२,०९,०७,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१) | ५६८ | १०० | महाराष्ट्र ही संतांची भूमी असून दरवर्षी आळंदी देहू ते पंढरपूर लाखोच्या संख्येने वारकरी पायी वारी करत असतात, तसेच आषाढी कार्तिकी एकादशीला आळंदी पंढरपूर येथे लाखोच्या संख्येने वारकरी येत असतात या वारकऱ्यांचे प्रश्न व इतर अडचणी सोडवण्यासाठी वारकऱ्यांसाठी वारकरी महामंडळाची स्थापना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (२) | ४९६ | १०० | माढा शहरात भुईकोट किल्ला असून त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जावई रावरंभा निंबाळकर यांची समाधी देखील तिथे आहे त्या ठिकाणी भुईकोट किल्ला सुशोभीकरण यासाठी पुरातत्त्व विभागाकडून निधी आलेला असणे, परंतु त्या ठिकाणी शिवसृष्टी करण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी पुरातत्व विभागात वाढीव निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ४९९ | १०० | सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रापैकी एक असणाऱ्या माढेश्वरी देवीचे मंदिर हे माढा शहरालगत आहे सध्या तिथे पुरातत्व विभागाकडून डागदुजीचे काम धिम्यागतीने सुरू असणे, त्या ठिकाणी वाढीव निधीची तरतूद करून त्या तीर्थक्षेत्राचा विकास होऊ शकेल याकरिता भरीव निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: झेडडी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४५२, पर्यटन**<br>**रूपये:- २०,८३,००,००,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (४) | ४५५ | १० | परळ येथील बारादेवी येथे प्राचीन हिंदू देवता शिव रूपातील मुर्ती असून सदर मुर्ती परळ येथे रस्ता बांधकाम करित असताना सन १९३१ मध्ये सापडली आहे. शिवाची मुर्ती जवळच्या बारादेवी मंदिरात हलविण्यात आली, तेव्हापासून प्राचीन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मुर्ती बारादेवी मंदिर येथे स्वतंत्र खोलीत ठेवण्यात आली आहे. सदर प्राचीन मुर्ती इ.स.५व्या किंवा ६व्या शतकाच्या उत्तरार्धातील असल्याबाबत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने प्रमाणित केले आहे. सदर मुर्तीमध्ये शिवाचे ७ रूप दर्शविण्यात आले आहेत. मध्यवर्ती प्रतिमेभोवती ६ शिव प्रतिमा असणे, प्राचीन मुर्तीची सप्तमूर्ती रचना आहे. प्राचीन मुर्तीची उंची सुमारे ३ ते ३.५ मीटर इतकी असणे, बारादेवी प्राचीन मुर्तीचे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने सन १९८५ मध्ये राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले असणे, आंतरराष्ट्रीय पुरातत्व संस्थेने देखील परळ येथील प्राचीन मुर्तीस ऐतिहासिक वारसेचा दर्जा देवून आंतरराष्ट्रीय वारसा म्हणून संरक्षित केला आहे. प्राचीन शिवमुर्ती असलेल्या परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करून पर्यटनाचा दर्जा देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मुंबईतील आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय ऐतिहासिक संरक्षित वारसा म्हणून दुर्लक्षित प्राचीन मुर्ती पर्यटकांना पाहता येईल तसेच मुंबईच्या पर्यटनात भर पडण्यास मदत होईल. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| (५) | ४५६ | १० | शिवडी येथे शिवडी किल्ला असून पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. सदर किल्ल्यावर फ्लेमिंगो पक्षी पाहण्याकरिता देशविदेशातील पर्यटक येत असतात शिवडी किल्ला हा मुंबईतील पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण आहे. अनेक शिवप्रेमी शिवजयंती उत्सव देखील येथे साजरा करतात त्यामुळे शिवडी किल्ल्याचे व परिसराचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. पर्यटकांकरिता सोयीसुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. शिवडी किल्ला सुशोभिकरण व दुरूस्तीबाबत विकास आराखडा बनविणे गरजेचे आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (६) | ५४० | १०० | माझ्या वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघांमध्ये जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांचे श्री क्षेत्र लोहगाव हे आजोळ असून श्री संत तुकाराम महाराज या ठिकाणी येत असत. तसेच लोहगाव या गावाला क-वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जाही प्राप्त असणे, या सर्व बाबींचा विचार करता श्री क्षेत्र लोहगाव येथील हरणतळे येथे तुकाराम महाराजांचा वावर असल्यामुळे आणि हरणतळ्या लगतच शासकीय जागा असल्यामुळे या ठिकाणी संत तुकाराम महाराजांचे भव्य स्मारक व पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी यापूर्वी पत्रव्यवहार करण्यात येणे, परंतु अद्याप याबाबत कोणती कार्यवाही झाली नसणे, तुकाराम महाराजांचे भव्य स्मारक व पर्यटन क्षेत्र लोहगाव येथे विकसित करण्याची मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (७) | ३९८ | १० | मढ बिच, मुंबई, मालाड पश्चिमचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा नसणे, परिणामी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असणे, यामुळे स्थानिक गावकऱ्यांचा रोजगार हिरावला जाणे, स्थानिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण होणे, स्थानिकांसाठी रोजगारनिर्मिती व्हावी, मढ बिचवर पर्यटनवृद्धी व्हावी, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ३९९ | १० | आक्सा बिच, मुंबई, मालाड पश्चिमचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा नसणे, पर्यटन विकास विभागाकडून आक्सा समुद्रकिनाऱ्याचे कोणतेही सुशोभीकरण झालेले नसणे, परिणामी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असणे, यामुळे स्थानिक गावकऱ्यांचा रोजगार हिरावला असणे, नागरिकांमध्ये पसरलेली तिव्र संतापाची व नाराजीची भवना, आक्सा बिचवर पर्यटनवृद्धी व्हावी, स्थानिकांसाठी रोजगारनिर्मिती व्हावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, |
| (९) | ४०० | १० | दानापानी बिच, मुंबई, मालाड पश्चिमचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, दानापाणी समुद्रकिनाऱ्यावर अनेक चित्रपटांचे चित्रीकरण होत असणे, परंतु पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा नसणे, परिणामी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असणे, त्यामुळे पर्यटकांमध्ये प्रचंड रोष निर्माण होणे, दानापानी बिचवर पर्यटनवृद्धी व्हावी, पर्यटन क्षेत्राचा विकास करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ४०२ | १० | मुंबईतील एक शांत परिसर, मनोरी बिच, मुंबई, मालाड पश्चिमचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा नसणे, परिणामी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असणे, यामुळे स्थानिक गावकऱ्यांचा रोजगार उपलब्ध होत नसणे, स्थानिकांसाठी रोजगारनिर्मिती व्हावी, स्थानिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण होणे, मनोरी बिचवर पर्यटनवृद्धी व्हावी, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ४०३ | १० | मढ किल्ला हा मालाड (पश्चिम), मुंबईतील मढ बेटावर स्थित एक छोटासा किल्ला असणे, १७ व्या शतकात टेहळणी बुरुज म्हणून हा किल्ला बांधला असणे, अंबुबेटावरील किल्ल्याचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा नसणे, पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत जाणे, अंबुबेटावरील किल्ल्याची डागडुजी करण्याची गरज निर्माण झालेली असणे, पर्यटनवृद्धी व्हावी यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१२) | ४०४ | १० | मुंबईच्या बाहेरील बाजूस असलेल्या गोराई बीचवर मनोरी खाडी ओलांडून फेरीने किंवा भाईंदरहून रस्त्याने पर्यटक पोहोचू शकतात, पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा नसणे, परिणामी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असणे, पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, गोराई बिचवर पर्यटनवृद्धी व्हावी व विकास करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ४०५ | १० | मुंबई, मढ, मालाड (पश्चिम) वटारपाडा किल्ला असणे, पर्यटन विभागाकडून किल्ल्याची देखभाल आणि दुरुस्ती केली जात नसणे, किल्ल्याचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा नसणे, परिणामी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असणे, वटारपाडा किल्ल्याची डागडुजी करण्याची गरज निर्माण झालेली असणे, पर्यटनवृद्धी व्हावी व स्थानिकांसाठी रोजगारनिर्मिती व्हावी, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ४१९ | १० | मढ, मालाड (पश्चिम), मुंबई येथील किल्लेश्वर किल्ला असणे, पर्यटन विभाग या किल्ल्याकडे लक्ष देत नसणे व त्याची देखभाल सुद्धा करीत नसणे, सन १७०० मध्ये बांधलेला किल्ला जुनाट आणि जीर्ण अवस्थेत असणे, शासनाने या ऐतिहासिक किल्लेश्वर किल्ल्याचे जतन करण्याची गरज असणे, पर्यटन वाढविण्यासाठी या ऐतिहासिक किल्लेश्वर किल्ल्याची त्वरित दुरुस्ती आणि जीर्णोद्धार करावा, पर्यटन विभागाला शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, पर्यटन वाढल्याने स्थानिकांना रोजगार मिळेल, त्या दृष्टीने शासनाने आवश्यक ती कारवाई करावी व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १८ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई